2371

इ. वि. का. राजवाडे संशोधन मंडळ धुळें.

—: हस्त लिखित ग्रंथ संग्रह :—

ग्रंथ क्रमांक ५३४९:वे १९ (२७५)

ग्रंथ नाम आत्मानात्म विचार.

विषय म. वेदांत.

" Joint project of the Rajawade Sanshodhan Mandal, Dhule and the Yashwantrao Chavan Pratishthan, Mumbai. "

मराठी

वेदांत

४३४ : वे ११

(1)

आत्मानात्म विचार

" Joint project of the Rajawade Sanshodhan Mandal, Dhule and the Yashwantrao Chavan Pratishthan, Mumbai. "

श्रीगणेशायनमः श्रीगुरु सिध्देश्वरायनमः कुलदेवतायनमः
श्री मारुतीराजायनमः आत्म विचार प्रारंभ: या जागां
दोनपदार्थ।श्लोक॥ दृग्दृश्यौ द्वौ पदार्थौ परस्पर विलक्षणौ॥
दृग् ब्रह्म दृश्यमाया इति वेदांत डिंडिम:॥१॥ दृग् आणि
दृश्य म्हणजे चैतन्य आणि ~~माया~~ जड ते परस्पर विलक्षण
आहेत. दृष्टा ब्रह्म दृश्य माया जें दिसतें भासतें ब्रह्म
चैतन्य आहे माया जड आहे हा वेदांताचा नगारा वाजं
वित सांगत आहे श्रुति आहे. तें ब्रह्म चैतन्य मी आहें
आणि जड माया मिथ्या आहे हा निरंतर विचार करून स्व-
स्वरूपाचा निश्चय करावा. तो विचार कैसा या विषयीं
गुरु शिष्य संवाद कथितो. सच्छिष्य श्री गुरुराजास शर-
ण होऊन त्यांची अनन्य भावे सेवा करून प्रसन्न मुख गु-
रु पाहून हात जोडुन विनंती करिता हे स्वामी विचार
करून ज्ञान झालें म्हणजे जन्म मरण सुटतें असें पुरा-
णांत व संत साधु सांगतात तो विचार कोणता व कसा
करावा तो मला कृपा करून सांगावा. म्हणजे मी त्या विचारानें
जन्म मरणा पासून सुटून परम आनंदातें पावेन. ऐसी शि
ष्याची विनंती ऐकून प्रसन्न होऊन त्याजला कृपें करून
सांगते झाले. श्री गुरु [illegible] आपण आत्म चैतन्य आहे.

Joint Project of the Rajwade Sanshodhan Mandal, Dhule and the Yashwantrao Chavan Pratisthan, Mumbai.

चैतन्य कोणास म्हणावें आपण असून दुसऱ्यास जाणतो जड
कोणतें आपणासही व दुसऱ्यासही जाणत नाहीं आत्म चै-
तन्य कोण आपल्यास जाणून दुसऱ्यास जाणतो तो. सच्चि
- ~~चिता~~दानंद आत्मा आपण आहे. श्लोक अहमस्मी सदा
भामी कदाचिन्नाहम प्रियः॥ ब्रह्मैवाहं मत सिद्धः सच्चिदा
दानंद लक्षणं॥१॥ याचा अर्थ मी आहें मी भासतों, मी प्रिय
आहें असा सच्चिदानंद मी आहें. असा विचार परावा. तोच्या
-चाच मी सच्चिदानंद कसाहें मला स्पष्ट करून सांगावें.
कारण शास्त्रही असेंच बोलतें, आपणही असेंच सांगता.
परंतु अनुभव मला कांहींच येत नाहीं. परंतु आपण कृपा
करून सांगितलें असता अनुभव मला येईल त्यास अनुभ
व ठसवून द्यावा. असी विनंती ऐकून श्री गुरु बोलतात.
श्री गुरु उवाच॥ श्लोक॥ शास्त्र दृष्टि गुरोर्वाक्यं तृतीयं
चात्म निश्चयः॥ त्रिविधं यो विजानाति समुक्तो नात्र संशय
याचा अर्थ. शास्त्र दृष्टि आणि गुरूचें वाक्य हें ऐकून वि
चार करून जो आपण केला निश्चय॥ असा त्रिप्रकारें नि
श्चय जाणून मुक्त होतो. तो निश्चय कसा जाणावा तरी अनु
भव सांगतो एकाग्र चित्तानें ऐक. जाग्रति स्वप्न सुषुप्ति

Joint project of the Rajwade Sanshodhan Mandal, Dhule and the Yashwantrao Chavan Pratishthan, Mumbai

या तिनी अवस्थेंत मी आहें असा तुला अनुभव आहे
म्हणून तूं सत् ॥ या तिनी अवस्थेला मी जाणतों असा तुला
अनुभव आहे ते चित् ॥ तो अनुभव कसा. प्रातःकाल पासून
अस्तमान पर्यंत जो कांहीं व्यवहार होतो तो तूं जाणतोस
आणि निजून स्वप्नामध्यें अश्व रथ गजादि पाहतोस त्यास
तूं जाणतोस. आणि गाढ सुषुप्ति निद्रा ती सुषुप्ति तीसही तूं
जाणतोस. कीं मला सुखें निद्रा आली. मी दुसरें कांहीं जाण
त नव्हतो. याप्रकारें तिन्ही अवस्थेला मी जाणतों असा तुला
अनुभव आहे तेव्हां तूं तिनी अवस्थेमध्यें आहेस म्हणून जाण
तोस यास्तव तूं चित्. तिनी अवस्थेत मी मला प्रीय आहें
असा तुला अनुभव आहे म्हणून तूं आनंद ॥ श्लोक ॥ वित्तात्पुत्रः
प्रीयः पुत्रात्पिंडः पिंडात्तथेंद्रियं ॥ इंद्रियाच्च तथा प्राणः प्राणा
दात्मा प्रिय परः ॥१॥ तो आनंद तूं कसा आहेस. उदाहरण.
जगीं सर्वांमध्यें द्रव्य प्रिय आहे तें कसें? स्व ग्रामांतून द्रव्या
साठीं देशांतरा प्रति जातो ॥ द्रव्या करितां हीन वर्णाची सेवा
करितो आणि दुष्ट दानें व लोकांचीं दुर्भाषणादिक सहन क
रून द्रव्य संपादन करितोस. म्हणून द्रव्य प्रिय आहे द्रव्या
हून पुत्र अधिक प्रीय आहे. कसा? जर पुत्र चोर्यादिके
कर्में करून राजगृहीं बंद पावला असतां तर त्या पुत्रास
सोडविण्या करितां राजास द्रव्य देऊन सोडवितोस.

(5)

म्हणून द्रव्या परीस पुत्र प्रिय आहे. पुत्रा पेक्षां देह प्रिय आहे
तो कसा? जेव्हां दुष्काळ वगैरे प्राप्त होतो तेव्हां पुत्रास देऊन
द्रव्यादिक घेऊन देहाचें संरक्षण करतोस. पशूच्या ठायीं-
ही देह प्रीय आहे यास दृष्टांत. वानर दोन प्रहर समयीं
तृषेनें पिडा पावून जल पानार्थ नदीस जातात. तेथें उन्हा
चे योगानें पाय तप्त होतात तेव्हां पोटास धरलेलें पिलू
तें गांडी खालीं घालून वर बसून पाणी पितात. तेव्हां
त्यास पोटास धरितात असें वारंवार करितात. तेव्हां
पुत्रा पेक्षां देह प्रीय आहे देहा पेक्षां इंद्रियें प्रीय आहेत.
ती कशी? कोणी छडी मारावयास आला असतां संपूर्ण
इंद्रियें अंकुचन करून राहतो आणि पाठीवर मार घेतो
डोळ्यावर कानावर मुखावर नाकावर मारू नको असे
म्हणतो म्हणून देहा पेक्षां इंद्रिय प्रीय आहेत. इंद्रियां पे
क्षां प्राण प्रीय आहे तो कसा? कोणी पुरुष अपराधी राजा
स सांपडला ~~आगला~~ तेव्हां राजानें आज्ञा केली कीं याचा
प्राण घ्यावा तेव्हां तो मनुष्य बोलला कीं माझें द्रव्य अथ
वा स्त्री पुत्रादिक घ्यावीत परंतु माझा प्राण घेऊं नका.
तेव्हां तें न ऐकून पुन्हा राजाची आज्ञा प्राण घेण्याविषयी
चीच झाली तेव्हां पुन्हां तो मनुष्य म्हणाला कीं माझे हात

Joint project of the Rajawade Sanshodhan Mandal, Dhule and the Yashwantrao Chavan Pratishthan, Mumbai.

पादादिके किंवा नाक छेदन करा. परंतु प्राण राखा. असें म्हणतो.
म्हणून इंद्रिया पेक्षां प्राण प्रीय होय. प्राणाही पेक्षां आत्मा अधिक
फार प्रीय होय. तो कसा कोणेका पुरुषास शुळादिक व्यथा झाली म्ह
णजे तो म्हणतो कीं माझा प्राण गेला तरी बरें होईल. परंतु व्यथा
सासवत नाहीं. प्राण गेला म्हणजे मी सुखी होईन. याजकरितां
प्राणाही पेक्षां आत्मा प्रीय आहे. तेव्हां जी जी व्यवाहारांत स्त्री
पुत्रादिक द्रव्याचे ठायीं प्रीयता ती आपलीच होय. परंतु अ
ज्ञानी जन ते न समजतां स्त्री पुत्राचे ठायीं प्रीयता आहे
असें मानितात. परंतु प्रीयरूप आपण आहों. त्यांत कांहीं
प्रीयता नाहीं कारण स्त्री पुत्र द्रव्याचा नाश झाला असतां
आपले प्रीयपणाचा नाश होत नाहीं. यास दृष्टांत. कुत्रें हाडांत
मांस रक्त असतें म्हणून हाड खातें चगळीत असतें. तेव्हां
त्यास दाढांतून रक्त निघतें ते प्राशन करून ते श्वान मानितें
कीं रक्त हाडांतून निघतें. परंतु रक्त त्यांत कांहीं नाहीं आप
लेच तोंडांतून निघतें असें त्यास समजत नाहीं. त्याप्रमाणे
अज्ञानी जन स्त्रीपुत्र द्रव्यादिकांचे ठायीं प्रीयता आहे असें
मानितो परंतु प्रीयता आपलीच आहे असें समजत नाहीं
म्हणवतें तेव्हां तूं आनंदरूप आहेस. कारण प्रीयतेचा अनु
भव तूं आपले ठायीं पाहीलास तेव्हां तूं सच्चिदानंद आहेस.

Joint Project of the Rajawade Sanshodhan Mandal, Dhule and the Yashwantrao Chavan Pratishthan, Mumbai.

असा विचार कर. शिष्योवाच. स्वामी सच्चिदानंद आत्मा
आहे तरी प्राण रहीत देह त्या देहांत मी आहे किंवा नाहीं
आहे जर म्हणावें तर ज्ञान नाही. हें कसें? गुरुरुवाच
तुझे स्वरूप सर्वगत तेव्हां तूं प्राण रहीत देहांत ही
व्याप्त आहेस. परंतु सामान्य आहेस विशेष नाहीस
का विशेष नाहीं सप्तदशलिंग तर सप्तदश कलात्मक लिंग
शरीर त्याचा तेथें अभाव आहे ते कोणते? प्राण पांच
ज्ञानेंद्रियें पांच मन आणि बुद्धि ऐसे सप्तदश कलात्मक
लिंग शरीर याचा अभाव म्हणून सामान्य व्याप्ति॥ यास दृष्टां
त सुर्याचें किरणांत अग्नि सामान्य आहे म्हणून वस्त्र कापूस
तृण काष्ट इत्यादि वस्तु असतात त्या उन्हानें दहन होत नाहीं
त्याच उन्हास सुर्य कांत मण्याची अथवा भिंगाची उपाधी
सानिध्य आली असतां जो सामान्य अग्नि तोच विशेष हो
ऊन वस्त्र कापूस तृणादि काष्ठ भस्म करितो. तसा सामान्य
आत्मा प्रकाशक सर्वगत ता प्रत्यक्ष ही आहे विशेष लिंग
देहो पाधी करून भासतो. म्हणून सामान्य आहेस. शिष्योवाच
सामान्य आत्माचें रूप कसें तें सांगावें॥ गुरुरुवाच.॥ सामा
न्य आत्म्याचें अस्ति भाती प्रीय रूप आहे. तें कसें:
जें आहे याचें नांव अस्ति जें भासतें याचें नांव भाती
जें प्रीय आहे याचें नांव प्रीय. जें तंव काय मिथ्या आहे?
आपआपले जाती च्या जेतास अन्य जाती चा स्पर्श होऊं देत
नाहीत. व दहन अर्थ करित नाहीत. संपुर्ण करतात. जेतांचें
नाव रूप मिथ्या सबब नाश होतें. तें कसें? जेतांचें नांवरूप

Joint project of the Rajwade Sanshodhan Mandal, Dhule and the Yashwantrao Chavan Pratishthan, Mumbai

~~[illegible]~~ नाश झालें असतां अस्ति भाती प्रीय आत्म्याचाही नाश होतो
कसा तरी दिसत नाहीं. उत्तर. प्रेत त्याचा नाश झाला तरी रक्षा आहे
म्हणून अस्ति भासते म्हणून भाती प्रीय आहे म्हणून प्रीय. प्रश्न
रक्षेंत प्रियता काय आहे? उत्तर ती रक्षा तेथून भरून नेऊन
कृष्णा गंगा नद्यादिकांचे ठायीं टाकतो. परंतु रक्षा हें नावरूप मिथ्या
आहे. रक्षेचा अभाव झाला असतां पृथ्वी आहे. पृथ्वी आहे
याचें नांव अस्ति भासते म्हणून भाती प्रीय आहे म्हणून प्रीय
पृथ्वींत प्रीयता काय आहे? पृथ्वीवर गृहादिक करून सर्वांचें
प्रीय होत आहे सर्व जिवाची उपजीविका पृथ्वीनें राज्यादिकें
करून राजे सुख वर्ततात. म्हणून पृथ्वी प्रीय आहे. परंतु पृथ्वीचें
नांव रूप हें मिथ्या आहे. पृथ्वीचा अभाव झाला असतां आप आहे
तें अस्ति भाती प्रीय आहे. आपांत प्रीयता काय आहे तरी स्नान
पान तृषानिवारण होते म्हणून उदक प्रीय आहे. त्याचें ही नांव
रूप मिथ्या. आपाचा अभाव झाला असतां तेज आहे [परंतु
त्याचें रूप मिथ्या आहे. तेजाचा अभाव झाला असतां वायू आहे]
तें अस्ति भाती प्रीय आहे तेजांत काय प्रीयता आहे. तरी पाकादि
क्रिया सीत निवारण होतें. म्हणून तेज प्रीय आहे.+ तो अस्तिभा
ती प्रीय आहे वायूंत काय प्रीयता आहे असें म्हणशील तर
उष्णाचें योगानें ताप झाला असतां वायूची अपेक्षा आहे व
श्वासोश्वास चालतात. तेणें करून सुख होतें म्हणून वायू
प्रीय आहे. वायूचा अभाव झाला असतां आकाश आहे.
ते अस्ति भाती प्रीय आहे. आकाशांत काय प्रीयता आहे तरी
अवकाश आहे म्हणून सर्व व्यापार जाण्या येण्यादि प्रीय.

Joint project of the Rajawade Sanshodhan Mandal, Dhule and the Yashwantrao Chavan Pratishthan, Mumbai

होतात. ह्मणून आकाश प्रीय आहे. आकाश ह्मणजे पोकळी. पोकळी ह्मणजे कांहीं नाहीं. या प्रकारें आकाशाचा अभाव झाला असतां आस्ति भाति प्रीय आपण आहे. कारण मुख्य आपलें स्वरूप सच्चिदानंद त्याची प्रभा हें जग सबब त्याजला सत्यत्व नाहीं नाश होतो. जसें सूर्य किरणावर मृगजळ दिसतें. तसें हें जग आहे. शिष्योवाच आस्ति भाति प्रीय आपलें स्वरूप आहे तें जड आहे किंवा चैतन्य आहे? याचा अनुभव कसा. गुरुरुवाच हें शिष्या स्वरूप जड नाहीं चैतन्य आहे. जसा सुषुप्तिमध्यें वृत्ति लीन झाली ह्मणजे सामान्य असतो नंतर जागृतीची वृत्ति चेतली ह्मणजे विशेषें करून स्फुरतो. ह्मणून तो कीं मला सुखें निद्रा आली ह्मणून सुषुप्ति कालचा अनुभव सांगतो. यास्तव आत्मा सामान्य रूपें करून सर्वगत आहे यास दृष्टांत. कोणेका मनुष्याचा तांब्या पाण्याचे कुपांत पडला. तेव्हां त्याने तो काढण्यास अन्य मनुष्यास द्रव्य देऊ करून त्या कुपांत उतरविला. तेव्हां तो उतरला तो मनुष्य जळांत बुडी मारून हातानें शोधून हातांत धरला. तेव्हां त्याजला सामान्य ज्ञान जळांत होतें. नंतर बाहेर येतो तेव्हां विशेषज्ञानें करून हा तुमचा तांब्या ह्मणून दाखवितो. दुसरा दृष्टांत. काष्टाचे निखाऱ्याचें ठायीं अग्नीचें तेज सामान्य दिसतें त्यांत घृत अथवा तेल घातलें असतां विशेष दिसतें. तसेंच उपाधीचा अभाव असला ह्मणजे सामान्य चैतन्यरूप आपण सर्वगत आहे. आपले स्वरूपाचा कधींही क्षय नाहीं. ये विषयीं भगवद्गीते श्लोक [ अविनाशि तु तद्विद्धि येन सर्वमिदं ततम्। विनाशमव्ययस्यास्य न कश्चित्कर्तुमर्हति ॥ ]

Joint project of the Rajwade Sanshodhan Mandal, Dhule and the Yashwantrao Chavan Pratishthan, Mumbai

तसा अविनाश स्वरूप आत्मा तूंच आहेस. तो तूं कसा आहेस. तें सांगतो ऐक. तूं देह त्रयातीत आहेस. पंच कोशाहून नि राळा आहेस. तें देहे त्रय कोणते स्थूल सूक्ष्म कारण असे तीन देह. पंच कोश कोणतें अन्नमय, प्राणमय, मनोमय, विज्ञानमय आनंदमय. आतां स्थूल देह कोणास म्हणावें त्याचें विवरण सांगतो ऐक. पंचीकृत पंच महाभूताचा स्थूल देह. ती भूतें कोणती पृथ्वी आप तेज वायु आकाश यो भूतांचें पंचीकरण एकेका भूतांची पांच पांच तत्वें एकूण पंचवीस तत्वांचा हा स्थूल देह ती कोणतींः आकाशा पासून काम क्रोध शोक मोह भय. म्हणजे शीर कंठ हृदय उदर कटी असे आकाशाचे भाग. वायु पासून चलण, वलण, धावन, आकोंचन, प्रसरण. असे वायुचे भाग. तेजा पासून क्षुधा तृषा, आलस्य निद्रा कांति. असे तेजाचे भाग. आपा पासून रेत रक्त, लाळ स्वेद, मुत्र. असे आपाचे भाग. पृथ्वी पासून अस्थि, मांस नाडी, त्वचा रोम. असे पृथ्वीचे भाग. याचे पंचीकरण केलें तें ऐके. अस्थि हे तत्व शरीरांत आहे तो मुख्य भाग ~~[illegible]~~चा पृथ्वीचा. तो कशावरून काठीण्य आहे आणि पीत वर्ण आहे म्हणून मुख्य पृथ्वीचा भाग होय. शरीरामध्यें पृथ्वीचा दुसरा भाग मांस आहे तो जलाचा आहे कसा तरी द्रव्यत्व आहे म्हणून. देहामध्यें पृथ्वीचा तिसरा भाग नाडी आहेत. तो अग्नीचा आहे कसा तरी ज्वरादिकाची परिक्षा त्यावरून होते म्हणून. देहामध्यें पृथ्वीचा चवथा भाग त्वचा आहे तो वायूचा होय कसा तरी स्पर्श धर्म तेथें आहे म्हणून. देहामध्यें पृथ्वीचा भाग पांचवा रोम आहे तो आकाशाचा होय. छेद केला असतां दुःखत नाहीं म्हणून. शरीरामध्यें वीर्य जें आहे तो मुख्य भाग आपाचा होय.

Joint project of the Rajwade Sanshodham Mandal, Dhule and the Yashwantrao Chavan Pratishthan, Mumbai.

कसातरी शुभ्रवर्ण आहे आणि त्या पासून गंभीरपणे होतो म्हणून.
शरीरामध्ये दुसरा भाग लाळ आहे तो आकाशाचा आहे कसा वर
खाली येत म्हणून. शरीरामध्ये तिसरा आपाचा भाग स्वेद आहे
तो वायूचा होय श्रम झाले असतां येतो म्हणून. देहामध्ये आ
पाचा चवथा भाग मूत्र आहे तो तेजाचा आहे कसा तर उष्ण
आहे व ज्वरादिकांची परिक्षा होते म्हणून. शरीरामध्ये आपा
चा पांचवा भाग आहे तो रक्त आहे तो पृथ्वीचा आहे कसा तर.
त्यापासून कठीण असे मांस होते म्हणून. शरीरांमध्ये क्षुधा
आहे तो मुख्य भाग तेजाचा आहे कसा तर अन्नादिकांचे पच
न होते म्हणून शरीरामध्ये दुसरा भाग तृषा आहे तो वायूचा
आहे शोषण स्वभाव आहे म्हणून शरीरामध्ये तिसरा तेजाचा
भाग कांति आहे तो आकाशाचा होय. कसा तर उन्हात गेल्याने अ
सतां अथवा ज्वरादिके करून कमी होते म्हणून. शरीरामध्ये
तेजाचा चौथा भाग आलस्य आहे तो पृथ्वीचा आहे कसा
तर आळस आला असतां जडता येते म्हणून. शरीरामध्ये
तेजाचा पांचवा भाग निद्रा तो आकाशाचा होय. कसा तर
शून्य स्वभाव होतो म्हणून. शरीरामध्ये धावन हा मुख्य
भाग वायूचा होय कसा तर वेग व बळ स्वभाव म्हणून. शरीरा
मध्ये वायूचा दुसरा भाग चलन तो जलाचा आहे कसा
तर शिथिल स्वभाव आहे म्हणून. शरीरामध्ये वायूचा ति
सरा भाग बळ तो तेजाचा होय. कसा तर उष्ण व स्पर्शानें
व्यापार होतो म्हणून शरीरामध्ये वायूचा चवथा भाग
प्रसरण आहे तो आकाशाचा होय. कसा तर बहुत जाग्यांत

Joint project of the Rajwade Sanshodhan Mandal, Dhule and the Yashwantrao Chavan Pratishthan, Mumbai.

हस्त पाद तेणे करून व्याप्त केलेले म्हणून. शरीरामध्ये वायूचा पं
चवा भाग अकुंचन आहे तो पृथ्वीचा होय. कसा तर हस्त पादादि
शरीर गोळा करून बसतो म्हणून. शरीरामध्ये शोक आहे तो मु
ख्य आकाशाचा होय. शून्य स्वभाव होतो म्हणून शरीरामध्ये का
म आहे तो आकाशाचा दुसरा भाग आहे तो वायूचा आहे
चंचल्य स्वभाव आहे म्हणून शरीरामध्ये आकाशाचा तिस
रा भाग क्रोध तो अग्नीचा, क्रोध आला असतां सर्व शरीर तप्त
होते म्हणून. तो तेजाचा भाग होय. शरीरामध्ये चवथा भाग
आकाशाचा मोह आहे तो जलाचा आहे मोह झाला असतां
शरीरास द्रव झाले म्हणून. तो आपाचा भाग होय. शरीराम
ध्ये आकाशाचा पांचवा भाग भय आहे तो पृथ्वीचा होय. मत्तांतरी
स्थाने सांगितली आहेत ती सांगतो ऐक. शरीरामध्ये मस्तकी
आकाश आहे ते आकाशाचे स्थान नाद उत्पन्न होत आहे म्हणून.
कंठामध्ये आकाश आहे ते भाग वायूचा होय. कसा तर सुखना
सीकापासून वायूचा संचार होतो म्हणून. हृदयामध्ये आकाश
आहे तो भाग तेजाचा होय. सर्वदा उष्ण असते व तेथे ज्ञान स्फु
रते. उदरांत आकाश आहे तो भाग आपाचा होय. सर्वदा जल
तेथे असते. कटी स्थानी आकाश आहे तो भाग पृथ्वीचा हो
य. सर्वदा तेथे गंध असते म्हणून. याप्रमाणे मत्तांतरी आहे
सर्व पंचीकृत पंच महाभूतांचा स्थूल देह आहे. या स्थूल
देहाचा साक्षी तू म्हणून स्थूलाहून निराळा आहेस. आतां
तूं सूक्ष्म देहाहून निराळा आहेस तो कसा तर ऐक.
अपंचीकृत पंच महाभूतांची सत्रा तत्वे त्यांचा हा सूक्ष्म
देह होय.

Joint project of the Rajwade Sanshodhan Mandal, Dhule and the Yashwantrao Chavan Pratishthan, Mumbai.

अपंची कृत महाभूतें व सत्रा तत्वांचीं नांवें सांगतो ऐक. प्राण, अपान, व्यान, उदान, समान. यांचीं स्थानें. हृदी प्राणो गुदे पान: समानो नाभी संस्थित: ।। उदान: कंठ देश स्थो व्यान सर्व शरीरग: ।।३।। हें प्राण पंचक. श्रोत्र त्वचा चक्षु जिव्हा घ्राण हे ज्ञानेंद्रिय पंचक. वाक, पाणी, पाद, वायु उपस्थ हें कर्मेंद्रिय पंचक. असीं तीन पंचकें मिळून. पंधरा आणि मन बुद्धि हीं दोन सतरा शकलात्मक लिंग शरीर. तें अपंची कृत कसें ते ऐक. आकाशाच्या सात्विक भाग श्रोत्र आकाशाचा राजसी भाग जीवाचा. ही दोन कार्यें आकाशाची यांचें सख्यत्व आहे. तें कसें? वाचा बोलली कीं म्हणजे कान ऐकतात. कानांनीं ऐकणें झालें तर वाचा बोलते. वायूचा सात्विक भाग त्वचा राजसी भाग हस्त हे दोन्ही वायूचीं कार्यें. हस्तांनें देतो घेतो स्पर्श करितो. त्वचेला कडू झालें असतां हस्त करून शीत निवारणार्थ प्रावरण घेतो. खाजवितो. उष्णनिवारणार्थ वारा घेतो. म्हणून वायूचे भाग आहेत. तेजाचा सात्विक भाग चक्षु राजसी भाग पाय हीं दोन्हीं तेजाचीं कार्यें होत. नेत्रानें रूप पहातो व कांटे वगैरे नाहींतसे पाहून पाऊल टाकतो. म्हणून तेजाचे भाग होत. नेत्रास विकार झाला असतां चरणास घृतादिक मर्दन करितात, त्यानें नेत्रास शीतलता येते. म्हणून तेजाचे गुण होत. आपाचा सात्विक भाग जिव्हा राजसी भाग शिस्न. जिव्हा रस ग्रहण करिते शिस्न त्याग करिते. म्हणून आपाचे भाग होत. पृथ्वीचा सात्विक भाग नासिक, राजसी भाग गुद. नासिक गंध ग्रहण करतें व गुद गंध त्याग करितें. म्हणून पृथ्वीचा भाग होय.

"Joint project of the Rajawade Sanshodhan Mandal, Dhule and the Yashwantrao Chavan Pratishthan, Mumbai."

पंचमहाभूतांचा शुद्ध सात्विकांश मन बुद्धि होय. कसे श्रोत्रादिक इंद्रिये आप आपला एकेक विषय ग्रहण करितात. मन बुद्धि सर्व इंद्रिया विषय ग्रहण करितात. पंच महाभूतांचा राजस गुणापासून पंच प्राण होत. सर्व इंद्रियांचे क्रियेत व्याप्त आहेत म्हणून. याप्रमाणे सप्तदशकलात्मक लिंग शरीर होय. याचा साक्षी तूं निराळा आहेस. तिसरा कारण देह तो अज्ञान त्याहून तूं निराळा आहेस. कसा ते ऐक. अज्ञानाचे कारण का पडले तर स्थूल सूक्ष्म त्यापासून झाले म्हणून कारण देह म्हणतात. त्या अज्ञानाला तूं जाणतोस. परंतु अज्ञानाचे स्वरूपास न जाणून म्हणतोस कीं मला प्रश्न करितां येत नाहीं. उत्तर देता येत नाहीं. कांहींच मला येत नाहीं असा अज्ञानाच्या लक्षणास जाणतोस म्हणून तूं अज्ञानाहून निराळा चैतन्यरूप साक्षी आहेस. पंच कोशाहून निराळा कसा ते ऐक. स्थूल देह अन्नमय कोश आहे तो कसा अन्न भक्षण करून मातापित्याचें अंगीं शोणित शुक्र उत्पन्न होते. त्या स्त्री पुरुषाच्या संयोग काळा म्हणजे शुक्र आणि शोणित एकत्र होऊन मातेचे उदरीं गर्भ होतो. पुढे ती माता अन्न भक्षण करिते तेणें करून तो गर्भ वृद्धीते पावतो. पुढे प्रसूत झाली म्हणजे मातेचे स्तनांत अन्न भक्षणेंकरून दुग्ध उत्पन्न होतें. ते प्राशन करून मूल वृद्धीते पावतें. नंतर थोर झाला म्हणजे अन्न भक्षणें करून देह वृद्धीते पावतो. नंतर अन्नमय पृथ्वीमध्येंच त्या देहाचा क्षय होतो. असा हा स्थूल देह अन्नमय कोश यास तूं जाणतोस. म्हणून अन्नमय कोशाहून तूं निराळा साक्षी आहेस.

Joint project of the Rajawade Sanshodhan Mandal, Dhule and the Yashwantrao Chavan Pratishthan, Mumbai.

आतां तीन कोश लिंग शरीरांतरगत आहेत ते कोणते. प्राण
मय, मनोमय, विज्ञानमय, ते कसे ते ऐक. दश तत्वांचा प्राण
मय कोश. तो कसा. प्राण पंचक, आणि कर्मेंद्रीय पंचक, अशी
दश मिळून प्राणमय कोश म्हणतात. ज्ञानेंद्रीय पांच आणि
सहावे मन यास मनोमय कोश म्हणतात. ज्ञानेंद्रीय पंचं
आणि बुद्धी यास विज्ञानमय कोश म्हणतात. असे तीन
कोश मिळून लिंगशरीर. याच्या कथा सर्वही जाणतोस,
यास्तव तूं याचा साक्षी निराळा आहेस. आता कारण देह
आनंदमय कोश आहे. कसा ते ऐक. सुषुप्तीमध्ये वृत्ती
लिनत आहे. तो आनंद कोश म्हणावा. प्रीय, मोद, प्रमोद
यानी युक्त जो त्यास आनंदकोश म्हणतात. अथवा
इष्ट दर्शन जन्य जो आनंद त्यास आनंदमय कोश म्हणतात.
त्याचे ~~ते~~ तीन प्रकार ते, प्रीय, मोद, प्रमोद ते कसे?
आपला पुत्र काशीस गेला तेथें वेद शास्त्रा~~चा~~ अभ्यास करू
न सभेंत पंडित जिंकून मोठी प्रतिष्ठा झाली. त्याला जोडीव
पांच हजार रुपये मिळाले. हे वर्तमान ऐकून जो आनंद
झाला त्याचे नांव प्रिय. याच प्रमाणें त्याचें पत्र आलें त्याचें
आनंद झाला तो मोद. पुढें तोच पुत्र घरी येऊन भेटला ते
व्हां जो आनंद झाला तो प्रमोद. असा जो वृत्ति जन्य जो
आनंद त्यास ही आनंदमय कोश म्हणतात. असो. त्याचा
दृष्टा मी निराळा आहे. या तीन देहाहून मी दृष्टिसाक्षी
चैतन्य निराळा आहे. या प्रकारे विचार करून जाण त्यास
तूं मुक्त आहेस. ये विषयीं प्रमाण, श्लोक.

A joint project of the Rajawade Sanshodhan Mandal, Dhule and the Yashwantrao Chavan Pratishthan, Mumbai.

जाग्रत स्वप्न सुषुप्त्यादि प्रपंच यत्प्रकाशते. तत्‌ब्रह्माह
मिती ज्ञात्वा सर्व बंधैही प्रमुच्यते ॥४॥ या प्रमाणे श्रुतीचें
वाक्य आहे. आतां तूं जिवेश्वर उपाधीहून निराळा
आहेस. शिष्योवाच. स्वामी, ईश्वर सर्वज्ञ मी जीव किंची
त्‌ज्ञ या दोनी उपाधीहून मी निराळा कसा? श्री गुरु ह्मणतात.
ईश्वराची माया उपाधी ह्मणजे ज्ञान. जिवाची अविद्या उपा
धि ह्मणजे अज्ञान. तूं जो चैतन्यरूप आहेस तो निरोपाधी
आहेस. तो प्रकार असा, तो ऐक. जीव उपाधीस त्वं पद ह्म
णावें. ईश्वर उपाधीस तत्‌पद ह्मणावें. असि पद ब्रह्म चैतन्य
जीव, ईश्वराचें चैतन्य एकच आहे. आतां जीवाच्या वाच्यार्थ
लक्षार्थ सांगतो ऐक. वाच्यार्थ ह्मणजे जिवोपाधी त्याजे
वरी तीन देह स्थूल सूक्ष्म कारण. या तीन देहाच्या
तीन अवस्था जागृती स्वप्न सुषुप्ति. या तीन अवस्थेचे
तीन अभिमानी, विश्व, तैजस, प्राज्ञ. आतां स्थूल देहाची
अवस्था जागृती. अभिमानी विश्व. स्थान नेत्र. वाचा वैखरी
भोग स्थूल, गुण रज, क्रिया शक्ति, अकार मात्रा, आतां सूक्ष्म
देहाची अवस्था स्वप्न अभिमानी तैजस, स्थान कंठ, वाचा
मध्यमा. भोग सूक्ष्म, गुण सत्व ज्ञान शक्ति उकार मात्रा. आ
तां कारण देहाची अवस्था सुषुप्ति अभिमानी प्राज्ञ स्था
न हृदय भोग आनंद द्रव्य शक्ति तमो गुण वाचा पश्यंति म
कार मात्रा या तीन देहास जीवोपाधी त्वं पद ह्मणतात. हा
त्वं पदाच्या वाच्यार्थ याच्या लक्षार्थ या उपाधीस असून नि
राळा जो साक्षि चैतन्य तो लक्षार्थ होय. ईश्वरोपाधी तत्

Joint project of the Rajawade Sanshodhan Mandal, Dhule and the Yashwantrao Chavan Pratishthan, Mumbai

पंदाचा वाच्यांश, लक्ष्यांश ऐक्य. ईश्वराचे देह तीन विराट, हिरण्य-
गर्भ, अव्याकृत. तीन अवस्था उत्पत्ति, स्थिती, प्रलय. अभिमा
नी तीन ब्रह्मा, विष्णु, रुद्र. वाच्यार्थ लक्ष्यार्थ ईश्वराचे पूर्ण
ब्रह्म चैतन्य जीवाचे स्थूल देह यास वेष्टी म्हणावें. अनंतांनं-
त जिवाचे स्थूल देह वेष्टि मिळून ईश्वराचे विराट समष्टि
देह होय. जिवाचा सूक्ष्म देह आणि ईश्वराचा हिरण्यगर्भ
दोहींचें ऐक्य. ईश्वराचे अव्याकृत आणि जिवाचे कारण
देह याचे ऐक्य. याचे प्रमाण. श्लोक स्थूल वैराजयो।
रैक्यं सूक्ष्म हिरण्य गर्भयोः॥ अज्ञान माययो रैक्यं प्र
त्यक् विज्ञान पूर्णयोः॥१॥ अस्तन मायेअविद्येचा त्याग
करून उभयंतरगत चैतन्याचे ग्रहण करावे. ते भागत्याग
लक्षण केल्या वाचून होत नाहीत. ती लक्षणे तीन प्रकार
ची आहेत. जहत् लक्षणा, अजहत् लक्षणा, जहदजहत्
लक्षणा. त्या कशाचे ऐक. जहत् लक्षणा म्हणजे त्याग.
यास उदाहरण, गंगायां घोषः म्हणजे गंगेत घर. गंगेत गव
ळ्यांची घरें आहेत; कोणीएक पुरुषास, कोणी एक मनु
ष्यानें पुसिलें की गौळवाडा कोठे आहे, त्याने गंगेमध्ये गवळी
आहे म्हणून सांगितले, परंतु त्या मनुष्यानें गंगेत शोध
केला नाही. वाच्यार्थाचा त्याग करून तीरी शोध केला.
वाच्यार्थ करावा तर गंगेत घोष राहणार नाही मरून
जाईल म्हणून तत्वमसि या महावाक्याचा अर्थ जहत्
लक्षण करून होत नाही.

कारण वाक्यार्थाचा त्याग होतो. तेव्हां ही लक्षणा प्रवृत्त होते.
कोठें तर मन ब्रह्म आहे ऐसी श्रुति म्हणती, तेव्हां या श्रुतीचा
वाक्यार्थ समग्र त्याग करून साक्षीचे ठाई लक्षणा करावी.
अजहर लक्षणा ती कशी त्याचें उदाहरण. शोणो धावती.
म्हणजे तांबडें धांवतें. या उदाहरणें करून समग्र वाक्यार्थ
ग्रहण होतो. कसा? तांबडें धावत आहे असें कोणी म्ह
णालें तर तांबड्या रंगाचा घोडा धांवतो. तेव्हां तांबडे आ
णि घोडा असे दोन्ही ग्रहण होतात. या वाक्यें करून समग्र
वाक्यार्थ ग्रहण होतो. म्हणून तत्त्वमसि या महावाक्यासही
अजहर लक्षणा प्रवृत्त होत नाहीं. ही लक्षणा सत्यज्ञानमन
न्तं ब्रह्म या वाक्यास प्रवृत्त होते. म्हणून तत्त्वमसि महा
वाक्यास जहदजहर लक्षणा करावी. म्हणजे वाक्यार्थ सि
द्ध होतो. त्याचे उदाहरण सोयं देवदत्तः जो हा काशीस
रामचंद्र नांवाचा पुरुष पाहिला तेव्हां तो गृहस्थाश्रमी
होता. तो आतां द्वारकेंत सन्यासरूपें पाहिला. या उदाह
रणांत ते देश हा देश तो काल हा काल यांचा परित्याग
करून पुरुषमात्र ग्रहण करावा. या प्रकारें जेथें तद्देश
म्हणजे परोक्ष मायोपाधी ईश्वर एतद्देश अपरोक्ष अ
विद्योपाधी जीव. या दोघांचा विरोद्धांश वाक्यार्थाचा परि
त्याग करून अविरुद्धांश लक्ष्यार्थ अंगीकार करून ऐक्य

"Joint project of the Rajawade Sanshodhan Mandal, Dhule and the Yashwantrao Chavan Pratishthan, Mumbai."

गत चैतन्य असि पदें करून गम्य तो मी आहे असा
नि श्चय करावा. ये विषयीं प्रमाण. श्लोक. संसर्गो वा
विशिष्टो वा वाक्यार्थो नात्र संमतः अखंडैकरसत्वेन
वाक्यार्थो विदुषां मतः ॥३॥ संसर्ग ह्मणजे नीळगुण
संबंधी कमळ, वा कमळ संबंधी नीळ गुण याला संस
र्ग ह्मणावा. असो येथें ब्रह्म संबंधी जीव नव्हे ह्मणून
संसर्ग वाक्याचें येथें ग्रहण नाहीं. विशिष्ट ह्मणजे दंड
विशिष्ट ह्मणजे दंडी. तसा येथें जीव ब्रह्म विशिष्ट नाहीं
ह्मणून विशिष्ट वाक्याचें ग्रहण येथें नाहीं. अखंडैक
रसवाक्यार्थयाचें ग्रहण आहे. त्यावर दृष्टांत गंगा
ची उपाधी मोठी, कूपीची उपाधी ~~लहान~~ ह्मणजे देह
लहान परंतु चैतन्य उभयतांचे एकच आहे. दुसरें उदा
हरण राजाची उपाधी मोठी व नकारी रयतेची उपाधी
लहान परंतु मनुष्य एकच आहे. तसे जीवोपाधी
ईश्वरोपाधी चैतन्य एकच आहे. यास दृष्टांत. श्लो
क. कोणी एक गृहस्थ रामचंद्र नांवाचा कुटुंबासुद्धां
काशी यात्रेस गेला. तो यात्रा संपूर्ण करून तेथें राहिला.
त्याला एक पुत्र कृष्णा नांवाचा ~~झाला~~. तीन वर्षांचा होता.
त्या पुत्रास तो तेथें कांहीं श्लोक व स्तोत्रें सांगत होता.
तो मकरपार चांगली ह्मणत असे तेव्हां तेथील उपा

Joint project of the Rajawade Sanshodhan Mandal, Dhule and the Yashwantrao Chavan Pratishthan, Mumbai.

सर्वांशीं त्या कुळावर फार प्रीति जडली. तेव्हां त्यानें कुळगु
रु विद्वान असा देखूनें त्यास काशीस ठेवून घेत
ला. व त्याची माता पिता आपले देशी नाशकास निघून गेली.
पुढें तो सात वर्षांचा झाला तेव्हां त्याचे व्रतबंधास पि
त्यानें इकडोनें द्रव्य पाठवूनें उपाध्याकडून तेथेंच मुंज कर
विली. नंतर तो थोर होऊन वेदशास्त्राध्ययन करून
सर्व मान्य विद्वान झाला. नंतर पित्यानें पत्र पाठवून
नाशकास येणें विषयी वारंवार पाठविलीं. त्याचें लग्न
त्याने व्यय करून वधू दहा वर्षांची पाहिली. तो उर्थ
पंचवीस वर्षांचा होता. त्याची वार परत होता. इकडे
इकडे तो कृष्णशास्त्री श्री काशी क्षेत्रांतून विद्वत्तेची
फार प्रतिष्ठा मिळवून नाशीक येथें निघून आला. तो
रामचंद्र नांवाच्या पित्याच्या घरीं पुसत आला. तो
त्या घरा पुढें बाहेर ओट्यावर बसला. तेव्हां घरांतू
न रामचंद्र नांवाचा ब्राह्मण येऊन त्याणें त्यास पुस
लें कीं तुम्ही कोठून आलां? तेव्हां तो म्हणाला कीं मी काशी
हून आलों. तेव्हां रामचंद्र म्हणाले आमचा पुत्र काशीहून
येणार होता. तो अद्याप आला नाहीं. तुम्हाला त्याचें वर्तमान
कांहीं ठाऊक आहे काय? तो म्हणाला सर्व ठाऊक नाहीं.
आमचे तीर्थरूप रामचंद्र [illegible] यांचें घर हेंच आहे?

" Joint project of the Rajawade Sanshodhan Mandal, Dhule and the Yashwantrao Chavan Pratishthan, Mumbai. "

(२१)

तेव्हां रामचंद्र पुसतो तुमचें नांव काय? तेव्हां तो म्हणा-
ला कृष्णशास्त्री गोखले. नंतर रामचंद्र म्हणतो की
रामचंद्रशास्त्री गोखले मजलाच म्हणतात. ~~नंतर~~
~~रामचंद्र म्हणतो~~ कीं हेंच घर आमचें असे ऐकतां-
च उठून पायावर डोई ठेविता झाला. त्यास आलिंगन
देऊन परम आनंद पावला. मग त्या पुत्रास हातीं धरू-
न गृहांत आला. तो रामचंद्राची स्त्री या कृष्णाच्या
स्त्रीची माता स्नान करून गृहांत बसली होती.
तिनें ते उभयतां पाहून आपले यजमानांबरोबर कोण
परका गृहस्थ आला म्हणून उठून उभी राहिली. तेव्हां
रामचंद्र म्हणतो. याला तूं कोण हा म्हणून ओळखलें?
तेव्हां ती बोलली मी ओळखीत नाहीं. असे त्या
स्त्रीकारणे ऐकून बोलतो हा कृष्ण आपला मु-
लगा. असे ऐकतांच तिजला आनंद होऊन
सप्रेम स्नान करून भेटती झाली. तरी त्या उभयतांनीं
त्याकालीं स्नान होतां याकालीं मेळा झाला. तेव्हां तो काल
तो देश न हा काल व हा देश याचा त्याग करून असा उच्च
प्रत्यय केला, तसें कीं चीत्तत्व आणि सर्वज्ञत्व या दोघां-
चा त्याग करून उभय सत्तत्व म्हणजे एकाच रूप होऊन

एक आहे तें खरें माझेरूप असे विचार करून ग्रहण करावे. म्हणजे मुक्तीच स्वतः सिद्ध तूं मुक्त आहेस, असें अ
सतां तूं भ्रांतीनें, वृत्ती जन्य उपाधीनें बंधत्व मानले
आहेस. विचार पाहिला असतां मुळी वृत्तीसच सत्यत्व
नाहीं मग उपाधीस कोठून असेल? शिष्य प्रश्न. स्वरूप
अद्वैत, निरधर्म, निर्वीकार असतां; त्यास वृत्ती होण्या
चें कारण काय? उत्तर ऐरेबापा, सूर्याचा प्रकाशस्वभाव
त्याची किरणें भूमीवर पडतात, त्याजवर जल भास दिसतो.
परंतु तें खरें नाहीं. ते प्रकाश सोडून पृथक दिसते असे
आहे काय? तसा स्वरूपाचा ~~स्वभाव~~ प्रकाश चैतन्य
स्वभाव त्याची वृत्ती किरणें. त्याजवर जग त्रयाचा भा
स दिसतो. तो खरा नाहीं, स्वरूपाचा प्रकाश सोडून पृ
थक दिसत नाहीं, तो मृगजल सूर्य किरणी भासले ते
हरणास सत्य वाटले म्हणून धावतात. तसे विचार न करणारे पुरुष अज्ञान त्यास हे सत्य वाटून देह वृत्ती संबंधी जन्म मरण मी कर्ता मी भोक्ता असे मानून विषयाच्या ध्यासे धांवतात. शिष्योवाच. स्वामी आपण चैतन्य रूप असतां
ना याचा अनुभव सर्व जिवांस कां नाहीं? गुरुरुवाच.
सर्व जिव आपले अज्ञानें आनून हे सत्यत्व मी चैतन्य अ

से जाणत नाहीं. प्रश्न त्यास अज्ञान होण्याचें कारण
काय? उत्तर जसे सूर्य किरणापासून अभ्र उत्पन्न
होऊन सूर्य आच्छादित करतें तद्वत. याविषयीं दृष्टांत
सांगतो ऐक. कोणी दहा ब्राह्मण मिळून यात्रेस नि
घाले तों मार्गांत नदी लागली. ती उतरून पैल तीरास
गेले. तेथें मोजूं लागले तों नऊच भरले कारण मोजणारा
आपणास सोडून मोजत होता. सर्वांनीं वेगवेगळे मो
जले. तरी नऊच भरूं लागले. तेव्हां ते परस्पर बोलूं ला
गले अरे दहावा कोठें दिसत नाहीं. तेव्हां नदींत बुडाला.
असे मानून रडूं लागले. तों पलीकडून एक स्वार आला.
त्यानें पुशिलें कीं कां हो रडतां? तेव्हां त्यांनीं सां
गितलें कीं आम्ही दहा असामी निघालो होतो. हल्लीं
मोजून पाहिलें तों नऊ भरतात. एक नदींत बुडाला.
म्हणून रोदन करितों. असें त्यानें एकेकांच मोजून
पाहिलें तो दहा आहेत. हे अज्ञानें रोदन करतात. तेव्हां
त्या स्वारानें त्यांना निराळे उभे करून त्यांतील एकाकडून
गणना करविता झाला. तेव्हां त्या मोजणाऱ्या ब्राह्मणानें
पूर्वीप्रमाणें आपणास सोडून नवांची गणना करून उगाच

Joint project of the Rajawade Sanshodhan Mandal, Dhule and the Yashwantrao Chavan Pratishthan, Mumbai.

पाहिला. तेव्हां स्वार म्हणतो. अरे हे नऊ आणि तूं दहावा.
म्हणून पाठीवर ताडण केलें. तेव्हां त्या ब्राह्मणास कळलें कीं
आपली गणना आपणास सोडून करित होतो. म्हणून भ्रां
ति झाली. त्यास या स्वारानें दशमज्ञान करून दिलें. म्ह
णून आपल्या शोक भ्रांतिजन्य होता तो गेला. परंतु सं
कटांत पडलों होतों. त्यापासून मुक्त झालो. आनंद झा
ला. या प्रकारें आपण सच्चिदानंद स्वप्रकाश चैतन्य ही
घन सर्व दृश्य असून अज्ञानें करून ब्रह्म नाहीं व भासत
नाहीं असें म्हणतो, हें अज्ञान म्हणावें. मी कर्ता मी भोक्ता मी
सुखी, मी दुःखी असें देह संबंधी मानतो, तो विक्षेप म्ह
णावा. गुरुशास्त्रा द्वारें स्वरूप सच्चिदानंद ब्रह्म सर्व गत
असें जें समजणें यास परोक्ष ज्ञान म्हणावें. आणि आपण
गुरु बोध करून तत्त्वमसि वाक्य द्वारानें मीच ब्रह्म आहे
असा निश्चय केला त्याला अपरोक्ष ज्ञान म्हणावें. परोक्ष
ज्ञानें करून अज्ञानें करून असत्त्व आवरणाची निवृत्ती
झाली, अपरोक्ष ज्ञानें करून अभाता आवरणाची निवृत्ति
झाली. मग ~~कर्तृत्व भोक्तृत्व~~ गेलें व कर्तृत्व भाग गेले रूपी जो
शोक त्याची निवृत्ती झाली. याचें नांव शोकापगम. स
च्चिदानंद स्वरूप मीच ब्रह्म आहे असें जाणून आनंद झाला
याचें नांव निरंकुश तृप्ती. या सात अवस्था दृष्टांत दार्ष्टां
तीं समान आहेत.

Joint project of the Rajwade Sanshodhan Mandal, Dhule and the Yashwantrao Chavan Pratishthan, Mumbai

शिष्योवाच, दृष्टांत सांग कसाऽ दशम मोजला क्या।
भ्रांति झाली ती प्रथम, अज्ञान, मोजतांना दशम नाही
भासत नाहीं ती दुसरी. आवरण दशम नदींत बुडाले।
असे मानून रडूं लागले ती तिसरी. विक्षेप स्यातानें दशम
आहे म्हणून सांगितले ती चवथी परोक्षज्ञान. मोजुन दाख
विले ती पांचवी अपरोक्षज्ञान शिरः स्ताडन रोदन केले
जो शोक ती सहावी. शोकापगम नव्ह, गणना करणारा
दशम मीच आहे म्हणून आनंद झाली ती सातवी निर
ंकुश तृप्ति, या प्रकारे वेदांत सिद्धांत, अज्ञान, आवरण, विक्षे
प, परोक्ष, अपरोक्ष, शोकापगम, निरंकुश तृप्ति. या सात
अवस्थेचा साक्षीपणानें तूं निराळा आहेस तोच तूं सच्चिदा
नंद रूप. प्रश्न. स्वामी ब्रह्म तर एकच आहे म्हणता. तरी सत्
चित् आनंद या तीन भेदांची कल्पना कां केली आहे? या
संशयाचे निराकरण करावें. उत्तर. अरे तूं सजातीय विजातीय
स्वगत भेद रहित एकच आहे. तो कसा आहेस ते ऐक श्लोक.
वृक्षस्य स्वगतो भेदः पत्र पुष्प फलादिभिः वृक्षांतरात्सजा
तीयो विजातीय शिलादितः ॥३॥ जसा लौकीकामध्यें वृ
क्षाचा स्वगत भेद म्हणजे पत्र पुष्प फळें आणि वृक्षाचा
सजातीय भेद म्हणजे वृक्षांतर, आंबा, पिंपळ, निंबादिक.
वृक्षाचा विजातीय भेद म्हणजे, वृक्ष आणि पाषाण
तसे स्वरूपांत भेद कांहींच नाहीत. प्रश्न. ब्रह्म आणि मा
या हा विजातीय भेद चैतन्यांत आहे. ब्रह्म

Joint project of the Rajwade Sanshodhan Mandal, Dhule and the Yashwantrao Chavan Pratishthan, Mumbai.

ईश्वर, जीव हा भेद सजातीय चैतन्यांत आहे. असें असतां आपण नाहीं कसें म्हणता. उत्तर अरे हे ब्रह्म चैतन्य सत्य आहे. अशीच माया सत्य असती तर विजातीय भेद सत्य होता, माया म्हणजे याभास सत्य असा अर्थ होतो. म्हणजे ती मिथ्या. मिथ्या म्हणजे खोटे काहींच नाहीं जेथे कांहीच नाहीं. त्याचा विजातीय भेद कसा होईल. म्हणून विजातीय भेद नाहीं. आतां सजातीय भेद म्हणशील तर जेथें माया मिथ्या सिद्ध आहे तेव्हां तज्जन्य जे जीव आणि ईश्वर हे कसे सिद्ध होतील. या मोनासीकुविःखिमा हा न्याय प्राप्त होतो. एतावता ब्रह्म चैतन्यामध्यें सजातीय भेद ही नाहीं. आतां स्वगत भेद म्हणशील तर सत् चित् आनंद. पत्र पुष्प फळ सारिखे निराळे नाहींत. जे सत् तेच चित्, चित् तेच आनंद यामध्ये भेद नाहीं व्यभिचार नाहीं. ये विषयीं दृष्टांत. जसा चंदन सुगंध, कडू आहे. दुसरा दृष्टांत शर्करा शुभ्र मिष्ट मृदु आहे, तिसरा दृष्टांत. कृष्ण तुळसी कृष्ण सुगंध आणि तिक्त आहे. तद्वत सुगंध शीतल कडू. चंदनाचे तेल काढले असतां ही तीन निराळी होत नाहीं ते. तसे हे दृष्टांत जाणावे. जडांत भेद नाहीं तर चैतन्यांत भेद कोठून येईल. या प्रकारे तूं सजातीय विजातीय स्वगत भेद रहित चैतन्य स्वरूप आहेस. शिष्याचा. चैतन्य असें जाणले असतां वृत्तीचा नाश होतो. गुरूवाच. अरे तूं त्रिपुटीहून वृत्ति व्याप्ति फळ व्याप्तिहून रहित आहेस. आतां तें पुसी म्हणजे.

Joint project of the Rajawade Sanshodhan Mandal, Dhule and the Yashwantrao Chavan Pratishthan, Mumbai.

ज्ञाता, ज्ञान ज्ञेय. प्रमाता, प्रमाण, प्रमेय. कर्ता क्रिया
कर्म इत्यादि त्रिपुटीहून तूं राहित आहेस.

" Joint project of the Rajawade Sanshodhan Mandal, Dhule and the Yashwantrao Chavan Pratishthan, Mumbai. "

## मूळ प्रत पाहण्यासाठी संपर्क

---

**इतिहासाचार्य वि.का. राजवाडे संशोधन मंडळ, धुळे**
राजवाडे पथ, गल्ली नं. १, धुळे-४२४००१ (महाराष्ट्र)
**दूरध्वनी क्रमांक** (०२५६२) २३३८४८
**Email ID** : rajwademandaldhule@gmail.com